दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २९४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१८ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## नितेश राणे यांना दणका; अटकपूर्व जामीन फेटाळला

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आमदार नितेश राणे यांच्या अटकपूर्व जामिन उच्च न्यायालयाने फेटाळला आहे. आज उच्च न्यायालयात याबाबत सुनावणी झाली. तसेच अन्य सहआरोपी मनीष दळवीच्या अटकपूर्व जामिनाला उच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे.

जिल्हा बँक निवडणुकीची रणधुमाळी दरम्यान १८ डिसेंबर रोजी कणकवली येथे शिवसैनिक संतोष परब यांच्यावर जीवघेण्या हल्ला झाला होता.

या प्रकरणी भाजप आमदार नितेश राणे यांच्यावर कणकवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे या प्रकरणी अटक होऊ नये म्हणून राणे पसार झाले होते. जिल्हा न्यायालयात त्यांनी अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. जिल्हा न्यायालयाने हा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला होता. त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते.

# सर्वसामान्यांचा आवाज हरपला! ज्येष्ठ नेते प्राध्यापक एन.डी.पाटील यांचे निधन

**कोल्हापूर । वृत्तसंस्था**

**शेकापचे ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील यांचे सोमवारी निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षाच्या सामाजिक, राजकीय जीवनातील अत्यंत धडाडीचे आणि लढाऊ नेतृत्व असलेल्या प्रा. एन. डी. पाटील यांची प्रकृती रविवारी अत्यंत गंभीर बनली होती. त्यांच्यावर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. पण त्यांची प्रकृती उपचारास फारसा प्रतिसाद देत नव्हती. अखेर उपचारादरम्यानच त्यांची प्राणज्योत मालवली.**

वातावरणात बदल झाल्याने त्यांना थोडी कणकण वाटत होती म्हणून प्रा. एन. डी. पाटील यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होत. पण तिथे गेल्यावर त्यांना लागोपाठ दोनवेळा ब्रेन स्ट्रोक आल्याने बोलणे बंद झाले. डॉक्टर त्यांच्या उपचारावर बारकाईने लक्ष ठेवून होते. प्रा. एन. डी. पाटील यांची प्रकृती ढासळत होती. गेल्या चार दिवसांपासून पासून त्यांची शुद्ध हरपली होती. त्यांची प्रकृती उपचारास फारसा प्रतिसाद देत नव्हती. अखेर उपचारादरम्यानच त्यांचे निधन झाले.

एन. डी. पाटील यांनी गेल्या ७० वर्षांहून अधिक काळ शेतकरी, कष्टकरी जनतेच्या प्रश्नी आवाज उठवण्याचे काम केले आहे. एन.डी. पाटील यांच्या निधनामुळे राज्याच्या सामाजिक, राजकीय जीवनातील लढाऊ नेतृत्व हरपलं असून कोल्हापूरसह राज्यावर शोककळा पसरली आहे. प्रा. एन. डी. पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य पुरोगामी चळवळीसाठी खर्च केलं. १५ जुलै १९२९ रोजी सांगली येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबात एन. डी. पाटील यांचा जन्म झाला होता.

नारायण ज्ञानदेव पाटील असे त्यांचे पूर्ण नाव असून १५ जुलै १९२९ ला सांगली जिल्ह्यातील ढवळी (नागाव) येथे शेतकरी कुटुंबात एन. डी. पाटील यांचा जन्म झाला. पहिल्यापासूनच शिक्षणाची आवड असणाऱ्या एन. डी. पाटील यांनी अर्थशास्त्र विषयातून एम.ए ची पदवी घेतली. त्यानंतर पुणे विद्यापीठातून एल.एल.बी चे शिक्षण पूर्ण केले होते.

प्रा. एन. डी. पाटील सर यांच्यावर आज, मंगळवारी कोल्हापुरातच अंत्यसंस्कार होणार आहेत. त्याआधी त्यांचे पार्थीव अत्यंदर्शनासाठी



कदमवाडी परिसरातील शाहू कॉलेज येथे ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर पंचगंगा स्मशानभूमी येथेच त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती कुटुंबियांनी दिली. तर कोरोना नियमाचे पालन करत २५ मान्यवरांच्या उपस्थितीतच पंचगंगा स्मशानभूमी येथेच अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

प्रा. एन. डी. पाटील यांच्या निधनाची बातमी समजताच ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ, आमदार पी.एन.पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ए.वाय. पाटील, मेघा पानसरे, संभाजी जगदाळे, मंजुश्री पवार, बळी पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी एन. डी. पाटील यांचे अंतिम दर्शन घेतले.



शेतकरी व कष्टकरी जनतेचा बुलंद आवाज हरपला आहे. महाराष्ट्राने एक संघर्षशील नेतृत्व गमावले आहे. महाराष्ट्रासाठी त्यांचे नेतृत्व प्रेरणादायी होते. अखंड महाराष्ट्रात बेळगावसह सीमा भाग यावा हा त्यांचा ध्यास होता. एन. डी. पाटील यांच्या जाण्याने महाराष्ट्राचे अतोनात नुकसान झाले असून मी त्यांना महाराष्ट्र राज्यातर्फे आणि शिवसेनेतर्फे अभिवादन करतो, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी शोक व्यक्त केला.

**उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री**



डॉ. एन. डी. पाटील यांच्या निधनाने महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी वर्गाप्रती आस्था असलेला, जनहिताशी अखेरपर्यंत बांधिलकी जपणारा तत्त्वनिष्ठ व निस्वार्थी नेता आज हरपला आहे. उपेक्षित लोकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी विधिमंडळातही आवाज उठवला, आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी सभागृह गाजवले. शेतकरी कामगार पक्षाची धुरा निष्ठेने सांभाळणाऱ्या एन. डी. पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची जबाबदारीही त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात तितक्याच क्षमतेने पार पाडली. संस्थेच्या वाटचालीतील त्यांचे योगदान कधीच पुसले जाणार नाही. सर्व कुटुंबियांप्रति या दुःखद प्रसंगी सांत्वना व्यक्त करतो. प्रा. एन. डी. पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**खा.शरद पवार**

## थोर विचारवंत एन. डी. पाटील एक तपस्वी नेता : रामशेठ ठाकूर



थोर विचारवंत प्रा. एन. डी. पाटील साहेब खरं तर एक अतिशय तपस्वी वृत्तीचा नेता, कुणालाही, कधीही न घाबरणारे, आपल्या मनात आहे ते स्पष्टपणे बोलणारे. गोरगरिब, शेतकरी असो किंवा कुठल्याही वर्गातील व्यक्ती असो त्या प्रत्येकाच्या बद्दल त्यांना कणव होती. आज वयाच्या ९३ व्या वर्षी ते आपल्या सर्वांना सोडून गेले, याचे मनाला अतिशय दुःख होत आहे. माझा आणि त्यांचा परिचय जवळपास ४५ वर्षांचा आहे. माझे सासरे जनार्दन भगत साहेब तसेच लोकनेते दि. बा. पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करीत होतो. एन. डी. पाटील साहेब दि. बा. पाटील साहेबांच्या कापड गल्ली येथील कार्यालयात येत असत. गव्हाण तसेच इतर आपल्या विभागात येत असत. १९६७ च्या दुष्काळापासून आम्ही एन. डी. पाटील साहेबांना जवळून ओळखत आहोत. आणि तेव्हा पासून त्यांचे समाजसेवेचे व्रत ते आजपर्यंत सुरूच होते हे आम्ही पहिले आहे. कधीही त्यांनी आजरपणाची तमा केली नाही. रयत शिक्षण संस्थेचे ते अनेक वर्ष चेअरमन राहिले आहेत. मला त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळाली आणि त्यांनी मला अतिशय प्रेम दिले. ते माझा आवडता नेता होते. त्यांचा आदर्श घेऊन माझी वाटचाल सुरु आहे. गरीब, दीनदुबळ्यांची कणव असलेले एन. डी. पाटील साहेबांचा सर्व क्षेत्रातील अभ्यास मोठा होता. त्यांनी स्वतःच्या जीवनाला कधीही महत्व दिले नाही. जवळचा, परका असा भेदभाव त्यांच्याकडे कधीच नव्हता. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात त्यांचे व्यक्तिमत्व आणि नेतृत्व उत्तुंग होते. जनार्दन भगत साहेबांच्या स्मरणार्थ पहिला पुरस्कार एन. डी. साहेबांना देता आला त्यांचा सत्कार आम्हाला प्रेरणा देऊन गेला. त्या बद्दल आम्ही स्वतःला धन्य मानतो. थोर एन. डी. पाटील यांच्या निधनाने सर्व क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून राज्याचेच नव्हे तर देशाचे मोठे नुकसान झाले आहे, अशी प्रतिक्रिया माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी थोर विचारवंत एन. डी. पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना दिली.

## पागोटे येथील हुतात्म्यांना ३८ व्या स्मृतिदिनी मानवंदना



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जासई येथील १६ व १७ जानेवारी १९८४ ला झालेल्या गौरवशाली व शौर्यशाली शेतकरी लढ्यात आपल्या न्याय्य मागण्यांसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्मा केशव महादेव तांडेल, कमलाकर कृष्णा तांडेल, महादेव हिरा पाटील या शूरविरांना मानवंदना देण्याचा कार्यक्रम पागोटे येथे संपन्न करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते हुतात्म्यांच्या अर्धपुतळ्यांना पुष्पहार घालून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

तर वीर वाजेकर विद्यालयातील एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी हुतात्म्यांना मानवंदना दिली. या कार्यक्रमासाठी कोकण शिक्षक मतदार संघाचे आ.बाळाराम पाटील, उद्योगपती जे.एम.म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जेएनपीटी विश्वस्त भूषण पाटील, अतुल पाटील, जे.डी.तांडेल, महादेव घरत, मेघनाथ तांडेल, सिमा घरत, संध्या ठाकूर, पागोटे ग्रामपंचायतीचे प्रभारी सरपंच मिलिंद तांडेल, ग्रामसेविका समिक्षा ठाकूर यांच्यासह हुतात्म्यांचे नातेवाईक आणि महालण विभागातील नागरिक उपस्थित होते.

# पेण येथे स्टेट बँकेच्या एटीएम वर ५६ लाख ३४ हजारांचा धाडसी दरोडा

**दै.रायगड नगरी । पेण**

काही दिकसंपूर्वी अज्ञात चोरट्यांनी तरणखोप येथील बंगला व एका रात्रीत १४ दुकाने फोडल्याची घटना ताजी असतांनाच आता चक्क चोरट्यांनी मध्य रात्री शहरातील मुख्य रस्त्यावरील सनसिटी इमारतीमधील स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या एटीएमवर धाडसी दरोडा टाकून दरोडेखोरांनी ५६ लाख ३४ हजार ८०० रुपये लंपास केले. सदर दरोड्याची घटना घडल्याने चोरांनी पेण पोलीसांना सरळ सरळ आव्हानच दिल्याचे बोलले जात आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, पेण शहरातील सनसिटी इमारतीमध्ये असलेले स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएम वर दरोडेखोरांनी दरोडा टाकून तब्बल ५६ लाख ३४ हजार ८०० चोरून पलायन केले. दरोड्याची माहिती मिळताच पेण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तपासाकरिता फॉरेन्सिक पथकही पाचारण करण्यात आले होते. त्याचप्रमाणे दरोडेखोरांचा मागोवा घेण्यासाठी श्वान पथकाची मदत घेण्यात येत आहे.

मागील महिन्यात तरणखोप येथेही राहत्या घरात दागिन्यांसह लाखो रुपयांची चोरीची घटना घडली होती. तसेच पेण शहरातील मुख्य मार्गावरील चौदा दुकाने चोरांनी एकाच रात्रीत फोडून चोऱ्या केल्या होत्या. त्यावेळी पोलिसांचा ससेमिरा टाळण्यासाठी आठ दुकानदारांनी पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवली होती. सदरची घटना ताजी असतानाच चक्क आज पहाटे शहरातील सनासिटी बिल्डिंग मधील स्टेट बँक ऑफ इंडियाचे मुख्य रस्त्यावरील एटीएम दरोडेखोरांनी गॅस कटरच्या सहाय्याने फोडून ५६ लाख ३४ हजार ८०० रुपयांची रोकड लंपास केली. या दरोडेखोरांनी स्वतःबरोबर आणलेला गॅस कटर व सिलेंडर एटीएम मध्येच टाकून पलायन केले. पेण शहरात एका मागोमाग एक अश्या अनेक चोरीच्या घटना होत असल्याने चोरांनी व दरोडेखोरांनी पेण पोलिसांना आव्हान दिले आहे. या घटनांमुळे पोलिसांच्या कार्यप्रणालीवर नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला आहे.

### स्टेट बँक अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा

**एटीएम वर पडलेल्या दरोड्यामुळे बँक अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा उघड झाला आहे. या एटीएमला बँक अधिकाऱ्यांनी साधा सीसीटीव्ही कॅमेराही लावला नव्हता. तसेच रात्रीच्या वेळी एटीएम वर सुरक्षा रक्षकही नेमला नव्हता. नेमका याच गोष्टीचा दरोडेखोरांनी फायदा घेतला असावा. कर्तव्यात कसूर करणाऱ्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पेण शाखेतील अधिकाऱ्यांवर बँक प्रशासनाने कारवाई करावी अशी मागणी शहरातील नागरिक करीत आहेत.**

### डी.बी.टीमची स्थापना

**पेण परिसरात घडणाऱ्या घटना उघडकीस आणण्यासाठी पेण पोलिसांनी डिटेक्शन ब्रँच (डीबी टीमची) स्थापना केली आहे. मात्र ही टीम कार्यरत असताना सुद्धा व्यापाऱ्यांची फसवणूक, घरांवर दरोडे, बाजारपेठेतील १४ दुकानांवर धाडसी चोऱ्या झालेल्या असताना त्या अजून पर्यंत उघडकीस न आल्याने पुन्हा एकदा या चोरट्यांनी चक्क स्टेट बँकेचा एटीएम फोडून आपली हुशारी सिद्ध केली असल्याने पेण पोलिसांची (गुन्हे प्रकटीकरण शाखा पेण) डीबी टीम काय करत आहे? अशी चर्चा पेणच्या जनतेत सुरू आहे.**

## श्री चंडिका ग्रामदेवीचा (पुन:दर्शन) महोत्सव उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा येथील नवसाला पावणारी आणि तळेवासियांची श्रध्दास्थान असलेली श्रीचंडिका ग्रामदेवी उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

तळा तालुक्यातील बारा वाड्यांचे हे ग्रामदेवता मंदीर शहरांतील अठरा वतनदार पगड जाती या मंदीर सोहळ्यात समाविष्ट होत असतात. देवीचा अभिषेक पुजा अर्चा होम हवन षोडशोपचार पुजा आणि सर्व गावातुन वाजत गाजत येणारे पालखी सोहळा हळदी कुंकू समारंभ हे जणु गावातील आगळी वेगळी पर्वणीच. ढोल ताशांच्या गजरात बारा वाडयांतील पालखी आपल्या मुख्य चंडिका मातेच्या मंदिरात पोहचतात. फुलांनी सजवलेल्या पालख्या पारंपारिक वेश परिधान करुन भक्तगण हातात भगवे झेंडे आणि खांद्यावर पालखी घेत ढोल ताशांच्या गजरात मंदिराकडे रवाना होतात. या वर्षी आनंदवाडी ग्रामस्थांना यजमान पद देण्यात आले होते. प्रतीवर्षा प्रमाणे दैवज्ञ समाजचे वतीने श्री चंडीका देवीच्या महापुजेसाठी सौ.व श्री शेखर वेदक श्रीगणेश पुजन सौ.व श्री रमेश सकपाळ व नवचंडीयाग सौ. शुभांगी व श्री संतोष पेलणेकर आनंदवाडी यांच्या हस्ते करण्यात आली. नवचंडी याग, षोडपोचार पुजा पौराहित्य संजय केळकर (गुरुजी सहकारी) पौराहित्य केले. यामुळे संपुर्ण परिसर भक्तीमय होऊन गेला होता. मंदिरासमोर भक्तांसाठी भव्य प्रांगणात उभारलेले मंडप भक्तांना आकर्षीत करून घेत होते. आकर्षक रंगरंगोटी, संरक्षक भिंतीना शोभनीय संदेश फलक खास आकर्षण ठरले. प्रशस्त पुरुष, लेडीज प्रसाधनगृह, सभामंडप विस्तीर्ण परिसर अतिशय शोभनीय असून भक्तांच्या स्वागतासाठी स्वयंसेवक दर्शनासाठी लागलेल्या भाविकांच्या रांगा देवीच्या मिळालेल्या दर्शनामुळे आनंद, प्रसन्नता यावेळी



दिसून येत होती. देवीच्या दर्शनानंतर भाविकांना महाप्रसादाची सोय केली जाते. परंतु कोरोनाच्या पाश्वभुमिवर नाईलाजाने यावेळी नियोजित कार्यक्रमात बदल करण्यात आला होता. इतर सर्व कार्यक्रम रद्द केले.महाप्रसादाचे ऐवजी लाडू प्रसाद म्हणून देण्यात आले. असंख्य भाविक आवडीने आनंदाने भक्तीभावाने चंडिका मातेचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. यामध्ये तळा शहरातील शाळा, कॉलेज महाविद्यालय आयटीआय कॉलेज येथील विद्यार्थी, शिक्षक वर्ग, व्यापारी, डॉक्टर्स, पत्रकार प्रतीष्ठीत मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित असतात. भाविकांची श्रध्दा आणि भक्ती यामुळे सारा परिसर भक्तीमय होऊन गेला होता पुर्वापार या मंदिरात वतनदारांना मिळत असलेला पुजेचा अधिकार व संपूर्ण वाड्यांना पुजेचा लाभ धार्मिक परंपरा जतन करुन ठेवणारी ही श्री चंडिका भवानी मंदिर ट्रस्ट उत्सव सोहळा आगळा वेगळा साजरा होत असतो.

.../२

## भाजपची अवस्था पाण्यातून बाहेर पडून तडफडणाऱ्या माश्यासारखी : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

खा. सुनिल तटकरे यांच्या हस्ते संभे, पालबुद्रुक, पुईत विविध विकासकामांचे शानदार भूमिपूजन व उदघाटन करण्यात आले. यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना खा. तटकरें यानी राज्य व देशविदेशातील घडामोडीवर भाष्य केले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पदाबद्दल भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या विधानावर खासदार सुनिल तटकरे यांनी रोखठोक भूमिका मांडली. दोन अडीच वर्षांपासून राज्यात शरद पवार साहेब, सोनिया गांधी व उद्धव ठाकरे यांच्या प्रयत्न व नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकार भक्कमपणे कार्यरत आहे. अशात भाजपची अवस्था पाण्यातून बाहेर पडून तडफडणाऱ्या मास्यासारखी झालीय असे खा.सुनिल तटकरे म्हणाले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली, प्रकृतीत सुधारणा झालीय, त्यांचे मुख्यमंत्री म्हणून आदर्श व उत्तम काम सुरू आहे.



कोव्हीडच्या काळात देशात महाराष्ट्राने केलेले काम प्रेरक ठरले, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकार भक्कमपणे काम करीत असून पुढील निवडणुका तिन्ही पक्ष एकत्रित लढवतील, पुढील २५ वर्षे हे सरकार भक्कमपने टिकेल असा विश्वास तटकरे यांनी व्यक्त

.../२

# उत्सवच, पण संयमाने

गेल्या काही वर्षांत सर्वच निवडणुकांच्या तारखा जाहीर होणे ते मतमोजणी व निकाल इथवर सगळ्या प्रक्रियेला खूप महत्त्व आले आहे. माध्यमांचा वाढता आणि सर्वस्पर्शी विस्तार हे त्याचे एक कारण आहे. राजकीय जागृती आणि समाज माध्यमांवरील राजकीय ध्रुवीकरणही कमालीचे वाढले आहे. यापूर्वी, मणिपूर किंवा गोव्यातील निवडणुका हा राष्ट्रीय विषय होत नसे. मुख्य निवडणूक आयुक्त सुशीलचंद्र उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर या पाच राज्यांचे मतदानाचे वेळापत्रक जाहीर करीत होते; तेव्हा ती पत्रकार परिषद राष्ट्रीय ब्रेकिंग न्यूज म्हणून प्रक्षेपित होत होती आणि पाहिलीही जात होती. केंद्रात सरकार कुणाचे, या प्रश्नाचे उत्तर बव्हंशी बिहारसहित उत्तर भारतावर अवलंबून असते. उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ मुख्यमंत्री असले आणि ते लोकप्रिय असल्याचे सांगितले जात असले तरी तेथे तीन दशकांत एक मुख्यमंत्री दुसऱ्या खेपेला जिंकून पुन्हा सिंहासनावर बसू शकलेला नाही. योगी हा इतिहास बदलतात का, हा अनेक अर्थांनी कळीचा प्रश्न आहे. येथे मायावतींचा बहुजन समाज पक्ष आणि काँग्रेस हे पक्ष मागे पडले असले तरी अखिलेश यादव यांना भरघोस प्रतिसाद मिळतो आहे. उत्तर प्रदेश आणि पंजाबमधील निवडणुका शेतकऱ्यांच्या आक्रमक व यशस्वी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवरही महत्त्वाच्या आहेत. त्यातच पंजाबात प्रथमच अकाली दल, भाजप, काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि कॅप्टन अमरिंदर सिंह यांचा पक्ष अशी बहुरंगी लढत आहे. सर्वच राज्यांत जुन्या मित्रपक्षांना निरोप देऊन ताकद आजमावण्याचे धोरण अमित शहा अध्यक्ष असल्यापासून भाजप राबवत आहे. त्यामुळे, पंजाबात भाजप व अकाली दल कित्येक दशकांनी परस्परांच्या विरोधात लढतील. स्पष्ट बहुमत मिळाले नाही तरी राज्यात सरकार कसे आणायचे, याची कृष्णकला भाजपने आत्मसात केली आहे. गोव्यात २०१७मध्ये तसेच सरकार आले होते. यावेळी केजरीवाल यांचा आप पंजाबप्रमाणे गोव्यातही भाजपला टक्कर देण्याच्या तयारीत आहे. करोनाच्या तिसऱ्या लाटेत होणाऱ्या या निवडणुकीत आयोगाने सभा, मेळाव्यांवर १५ तारखेपर्यंत बंदी घातली आहे. ती गरज पडली तर वाढवायला हवी. बंगालमध्ये सारे पक्ष बेछूट वागले आणि त्याची फळे सामान्य नागरिकांना सोसावी लागली. असे आता होता कामा नये. आपण घटनात्मक संस्था असून केंद्र सरकारचे अंकित किंवा आश्रित नाही; याची स्पष्ट जाणीव निवडणूक आयोगाच्या निर्णय व वर्तनात दिसायला हवी. दुसरीकडे, इतकी व्यापक डिजिटल क्रांती झाली असताना प्रचारफेऱ्या, सभा, मेळावे, पदयात्रा नकोतच, हे सर्व पक्षांना कळायला हवे. करोनाचा प्रसार न वाढविणे, ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. या संयमाचे उदाहरण पंतप्रधान मोदी आणि भाजपने सर्वांसमोर घालून द्यावे. आयोगाने निवडणूक पुढे न ढकलता मतदानाची वेळ तसेच मतदान केंद्रांची संख्या वाढवली आहे. कर्मचाऱ्यांची नियमावली जारी केली आहे. ही पावले उचित आहेत. आता आयोगाला राजकीय पक्षांनी प्रामाणिक प्रतिसाद दिला नाही तर आयोगाने कठोर कारवाई करायला मागेपुढे पाहू नये. या निवडणुकांचा निकाल काय लागतो, यावर लगेच १९ राज्यसभेच्या जागांचे भवितव्य ठरेल. मात्र, त्याहून महत्त्वाची अशी नव्या राष्ट्रपतींची निवड यंदा होणार आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंडमध्ये विजय मिळाला नाही तर आपल्याच उमेदवाराचा आग्रह धरणे, भाजपला सोपे नाही. त्याहीपेक्षा, ही निवडणूक पार पडल्यानंतर बरोबर दोन वर्षांनी, २०२४ मध्ये लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक होईल. या निवडणुकांची व्यूहरचना कशी असेल, हे या पाच राज्यांच्या निकालांवर बरेचसे अवलंबून आहे. मोदींनी एव्हाना विकास या मूळ अजेंड्याला हिंदुत्वाची जोड स्पष्टपणे दिली आहे. राहुल गांधी यांनी हिंदुत्व-हिंदू धर्म-हिंदूपण ही चर्चा सुरू करण्यामागे तेच खरे कारण आहे. विरोधक भाजपच्या या अजेंड्याला पंजाब, उत्तर प्रदेश, उत्तराखंडमध्ये अजेंडा बदलून उत्तर देतात का, हा सर्वाधिक औत्सुकाचा मुद्दा आहे. शेतीचा महत्त्वाचा विषय त्यासाठी आहे. उत्तरेतील तीन राज्यांमध्ये आज कोणतीही दृश्य लाट नाही; ही समाधानाची बाब आहे. ही स्थिती अशीच राहिली तर मतदार थोडे शांत चित्ताने विचार करू शकतील. अर्थात, आज माध्यमांच्या विस्तारामुळे एखादा विषय समाजमनाला भिडला तर अशी लाट अवघ्या काही तासांत उसळू शकते. याचा अनुभव आधी आला आहे. मात्र, तसे न होणे किंवा न करणे, हे लोकशाहीच्या हिताचे आहे. जगावर नजर टाकली तर भारतात जागोजागी दर काही वर्षांनी होणारा लोकशाहीचा उत्सव आणि त्यात साऱ्या देशाने मनाने गुंतून जाणे, ही देशात संसदीय लोकशाही मुरल्याची सुलक्षणे आहेत. म्हणूनच, सर्व पक्षांच्या छोट्या-मोठ्या नेत्यांनी जिभेला लगाम घालून खिलाडूपणे हा खेळ खेळावा.

# खोपोलीतील पालिका रुग्णालयातील उर्मटपणाला मिळणार लगाम

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगर परिषदेच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर संगीता वानखेडे यांच्या मनमानी व उमर्द, उध्दट वागणुकीच्या निषेधार्थ व शहरातील वाहतूक कोंडी च्या संदर्भात नागरिकांना होणाऱ्या त्रासाबद्दल मुक्तता मिळावी यासाठी ज्येष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते भाई जगन्नाथ ओव्हाळ यांनी १० जानेवारी रोजी बेमुदत उपोषण केले होते. त्या दरम्यान नगरपालिकेच्या वतीने याबाबत कारवाई करण्याचे आश्वासन दिले. मात्र तांत्रिक अडचणी मुले फक्त पत्रव्यवहार करण्यात आल्याने पुन्हा मुख्याधिकारी दुरे यांची भेट घेऊन स्मरण पत्र दिल्याने तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहे त्यामुळे डॉक्टरांचा उर्मट पणाला लगाम बसणार असून वाहतूक कोंडीवर मार्ग काढणार असल्याने ओव्हाळ यांच्या उपोषणाला यश आले आहे.

खोपोली शहरात नागरिकांच्या सेवेसाठी नगरपालिकेच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात डॉ संगीता वानखडे या येणाऱ्या रुग्णांना व त्याच्या नातेवाईकांना सेवा देताना अधिकारापेक्षा धाक दाखवून अपमानित करण्याचा प्रयत्न करीत सेवा देताना ही पुढील उपचारासाठी अलिबाग किंवा गरज नसताना अन्य रुग्णालयात जाण्याचा सल्ला देत असल्याचा अनुभव अनेक खोपोली शहरातील नागरिकांना आल्याने याबाबत खोपोली शहरातील नागरिकांच्या समस्या जेष्ट सामजिक कार्यकर्ते भाई ओव्हाळ यांच्याकडे अनेकांनी कैफियत मांडल्या होत्या. त्याचबरोबर शहरातील वाहतूक कोंडी बाबत मार्ग काढावा या मागण्यासाठी ओव्हाळ यांनी नुकताच आमरण उपोषण केले होते. या दरम्यान खोपोली नगरपालिकेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी उपोषणकर्ते भाई ओव्हाळ यांची भेट घेतली होती. यावेळी पदाधिकारी यांच्याशी चर्चा करुन मनमानी कारभार करणाऱ्या डॉ. संगिता वानखेडे यांचेवर तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते व वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी खालापूर प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे, सचिव रविंद्र मोरे, समाधान दिसले, राज(बंटी) साळुंके, आण्णा मलबारी, पत्रकार दिलीप पवार, संदीप ओव्हाळ, तय्यब खान, मेहबूब जमादार, दिनेश पाटील, संतोषी म्हात्रे, सारिका सावंत, आकाश जाधव, शेखर परब, शिवाजी जाधव, भारतीय बौद्ध महासभेचे भगवान खंडागळे, व्यापारी असोशिएशनचे दिलीप पोरवाल, विष्णू रेडे, बी.एस. करडे, ललित पाटील. अनील अंकुश, महेश काजळे, राहूल जाधव, बावस्कर, सुयश ओव्हाळ आदी मोठ्या संख्येने खोपोली शहरातील नागरिक उपस्थित होते. त्यामुळे भाई ओव्हाळ यांनी बेमुदत उपोषण स्थगित केले. मात्र त्यानंतर काहीसा वेळ जात असल्याने सोमवारी पुन्हा भाई ओव्हाळ यांनी मुख्याधिकारी अनुप दुरे यांची भेट घेऊन चर्चा केली असता तात्काळ सहकारी अधिकारी साळवे यांना सूचना करून दोन दिवस त्याच्या कडून पदभार काढून घेण्याचे आदेश देत त्रिसदस्य समिती नेमून चौकशी करून पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तसेच शहरातील वाहतूक कोंडी बाबत पोलीस प्रशासनाचे सहकार्य घेऊन शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल असे आश्वासन दिले. त्यामुळे उपस्थित पत्रकार बंधूनी आभार व्यक्त केले. खऱ्या अर्थाने उपोषणाला यश आल्याची भावना भाई ओव्हाळ यांनी व्यक्त केले.



# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विरंगुळा केंद्राचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील हुतात्मा स्मारक उद्यानात दर्शना भगवान भोईर यांच्या नगरसेविका निधीतून ज्येष्ठ नागरिकांसाठी उभारण्यात आलेल्या विरंगुळा केंद्राचे उद्घाटन रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

पनवेल महापालिकेतील सत्ताधारी भाजपचे नगरसेवक-नगरसेविका नागरिकांना सातत्याने विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देत आहेत. त्यालाच अनुसरून प्रभाग क्रमांक १९मधील कार्यतत्पर नगरसेविका दर्शना भोईर यांनी आपल्या नगरसेविका निधीतून ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळा केंद्र उभारून दिले आहे. या विरंगुळा केंद्राच्या उद्घाटन समारंभास सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका रूचिता लोंढे, तसेच मधुकर उरणकर, गोपीनाथ लोखंडे, चंद्रकांत मंजुळे, राजू कोळी, हरिश्चंद्र भगत, अंजली इनामदार, अस्मिता गोसावी, कविता पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. पनवेल महापालिकेतील भाजपच्या नगरसेविका दर्शना भोईर या एक क्रियाशील लोकप्रतिनिधी असून, प्रभागातील नागरिकांच्या समस्या मार्गी लागाव्यात, तसेच त्यांना विविध सेवा-सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी तत्पर असतात. त्यांच्या कामाचे कौतुक होत आहे



# सर्दी-कोरडा-खोकला प्रचंड, व्हायरल लोकांची प्रतिकारशक्ती नाजुक ; मात्र सहनशक्ती वाढली

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

कोरोनाची आकडेवारी पाहता उपजिल्हा रुग्णालय माणगांव मधिल गेले पंधरा दिवसात दि. १ जानेवारी पासुन १६ जानेवारी २०२२ कोरोना ॲण्टीजन चाचणी अहवालानुसार, दि. १ जाने. ते ४ जाने. पर्यंत जवळपास ७० लोकांची चाचणी केली परंतु एकाचाही रिपोर्ट पॉझिटीव्ह आला नव्हता, मात्र ५ जाने. रोजी ३१ जणांची चाचणी केली असता २ जण पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले होते. त्यानंतर ६ जानेवारीला पुन्हा ४२ जन चाचणी पैकी सर्वच्या सर्वच निगेटिव्ह होते.

त्यानंतर मात्र दि. ७ जाने. रोजी ४४ चाचणी पैकी ८ जन पॉझिटिव्ह, दि. ८ जाने. २८ चाचणी पैकी १९ पॉझिटिव्ह, दि.९ जाने २७ पैकी २१ तर १० जाने. ६४ पैकी २८ तर दि. ११ जाने. ६१ पैकी २४, दि. १२ जाने. ६९ पैकी २६, दि. १३ जाने ७२ पैकी २२, दि. १४ जाने. ४९ पैकी १६, दि. १५ जाने. ५४ पैकी २०, दि. १६ जाने. रविवार २६ पैकी ११जन पाझिटिव्ह रुग्ण आढळून आले आहेत. यामध्ये तालुक्यातील इतर चाचणीचे अहवाल समाविष्ठ नाहीत. उपजिल्हा रुग्णालयातील चाचणीत दररोज सरासरी साधारणतः १८ जन पॉझिटिव्ह रुग्ण आढळले आहेत. कधी नव्हेते रायगड जिल्ह्यात पोलीसही मोठ्या प्रमाणात बाधित झालेत.

अशातच जवळपास प्रत्येक घराघरात सर्दी, कोरडा खोकला प्रचंड व्हायरल झाला असल्याचे चित्र दिसून येत आहे. तसेच माणगांवातील सर्वच खाजगी, सरकारी रुग्णालयात औषधोपचारासाठी गर्दी होत आहे. साधी सर्दी खोकला हिच लक्षण दिसून येत आहेत. पण एकाच वेळी एवढ्यामोठ्या प्रमाणात जवळपास सर्वच कुटुंबात हा त्रास सहन केला जात आहे. सर्व मेडिकल स्टोअर्स मध्ये ण्टी व्हायरल औषध गोळ्या, पॅरासिटिमॉल, कफ सिरप, वाफाऱ्यासाठी कॅपसुल, खोकला, कफ घसादुखी, तापावरील गोळ्या तसेच पित्तशामक गोळ्यांचा खप वाढला आहे.

विचित्र हवामान अवकाळी पाऊस कमी जास्त उष्णतामान व वातावरणात गारठां, सकाळी पडणार धुकं या सर्वांचा परिपाक लोकांची प्रतिकारशक्ती जरी नाजुक झाली असली तरि सहनशक्ती मात्र वाढल्याचेच दिसून येत आहे. कारण मेडिकल मधुन आणलेली सर्दी खोकल्याची औषधंच उपयोगी ठरत असल्याचे बोलले जात आहे. एकाच वेळी अशा प्रकारे वाढलेला आजार, ओमिक्रॉन सदृष्यच आहे. मात्र सुदैवाने गंभीर परिणाम नाहीत, ही जमेची बाब आहे. मात्र साथ वेगाने पसरत आहे. कोणत्याही प्रकारे सध्या लॉकडाऊन नसल्याने, लोक निश्चिंत आहेत. काही अपवाद वगळता लोक स्वतःहून मास्क लावताना आढळुन येत आहेत. परंतु वातावरणात पुढील काही दिवसात आणखी थंडी वाढली तर मात्र चिंता वाढतील, सर्वांनी अजुन पुढील काहि महिने, दिवस तरी कोरोना प्रतिबंधक आचार संहितेचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे झाले आहे. समोरील बिकट परिस्थितीचा आढावा घेतला असता आता दूसरा पर्याय नाही. लोकांनी दोनदा लसिकरण करुन कोरोना आवरत नाही. अस जरी असल तरी लॉकडाऊन करुन आता कोणाचेच भले होणार नाही. हे मात्र निश्चित इकड आड तिकड विहिर पर्याय फक्त एकच, माझ कुटुंब माझी जबाबदारी, विलगीकरनातही पाळुया सर्वांनीच नियमावली.

# प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या खेळाडूंसह प्रशिक्षकांची ऐतिहासिक कामगिरी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या ५५ व्या सबज्युनिअर आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेत प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल, विलेपार्ले येथील १९ खेळाडूंनी मुंबई उपनगर संघाचे प्रतिनिधित्व करत ३७ पदकांची कमाई केली.

या स्पर्धेत मुलींच्या वयोगटात नीती दोशी, नेहा पास्ते, उर्वी परब, अनन्या तिर्लोटकर व अलिशा टाककर यांनी १२ वर्षा खालील सांघिक रौप्य पदक तसेच स्वाती मोहिते, मुद्रा झगडे, टियाना क्रास्टो व हर्षल घोलम यांनी १० वर्षा खालील सांघिक कांस्य पदक प्रशिक्षक अचल रेवाळे व विशाल लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पटकावले.

मुलांच्या १४ वर्षाखालील वयोगटात अध्यान देसाई याने वैयक्तिक ७ पदके जिंकत प्रथम, जश पारीख याने ५ पदके जिंकत द्वितीय क्रमांक शुभम गिरी यांच्या





मार्गदर्शनाखाली प्राप्त केला. याच वयोगटात अमन देवाडिगा याने २ व मन कोठारी याने सुद्धा ३ पदक कमावले. १२ वर्षाखालील वयोगटात वीर गाला, आश्रव वर्तक यांनी प्रत्येकी २ पदके पटकावत तनिष पुरी याच्यासोबत सांघिक विजेतेपद जिंकले.

१० वर्षाखालील वयोगटात जीत चव्हाण ४ पदके जिंकत वैयक्तिक द्वितीय क्रमांक मिळविला, त्याच्याच जोडीला जय तहसीलदार आणि चिन्मय दुखांडे यांनी सांघिक विजेतेपद मिळविण्यासाठी मदत केली.

प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाचे व मुंबई उपनगर मुलांच्या संघाचे प्रमुख प्रशिक्षक शैलेंद्र लाड यांनी मुलांच्या १० , १२ व १४ या तिन्ही वयोगटात राज्यस्तरीय सांघिक अजिंक्यपद जिंकून देऊन इतिहास घडविला.

या ऐतिहासिक कामगिरी बद्दल प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाचे श्री. अरविंद प्रभू (अध्यक्ष), डॉ. मोहन राणे (सचिव), नीलम बाबरदेसाई (जिम्नॅस्टिक्स विभागाच्या प्रमुख) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, खेळाडू, प्रशिक्षक आणि पालकांसह संपूर्ण प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या संघ परिवारावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# रायगड जिल्हा नियोजन समिती मार्फत आदिवासी वाड्यां-पाड्यांसाठी विशेष निधीची तरतूद करावी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

शासन निर्णयाप्रमाणे ज्या तालुक्यामध्ये किंवा जिल्ह्यामध्ये आदिवासी बहुल भाग आहे, तसेच २००१ च्या लोकसंख्या विचारात घेऊन शासन निर्णयानुसार शासनाने निर्धारित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्र, माडा आणि मिनी माडा म्हणजेच टी एस पी या क्षेत्राकरिता महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागामार्फत आदिवासींच्या सर्वांगीण विकासाकरिता विशेष निधीची तरतूद केली जाते. परंतु रायगड जिल्ह्यामध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रांमध्ये समाविष्ट नसलेल्या आदिवासी वाड्या-पाड्या यांच्या सर्वांगिन विकासासाठी कोणत्याही प्रकारची विशेष निधीची तरतूद करण्यात आलेली नाही.

विशेषता ज्या आदिवासी वाड्या-पाड्या आदिवासी उपयोजन, माडा, मिनी माडा या क्षेत्रात समाविष्ट आहेत त्यांना आदिवासी विकास विभागामार्फत विशेष निधीची तरतूद केली असतांना देखील जिल्हा नियोजन निधीचा ही डबल लाभ मिळतो. परंतु ज्या आदिवासी वाड्या -पाड्या आदिवासी उपयोजना,माडा आणि मिनिमाडा क्षेत्रामध्ये समाविष्ट नाहीत त्यांना ना आदिवासी खात्याचा निधी ना जिल्हा नियोजनाचा विशेष निधी मिळत नाही.

सदरच्या वाड्या-पाड्या या आजपर्यंत सार्वजनिक विकासापासून वंचित राहिल्या आहेत म्हणून एका जिल्ह्यामध्ये राहणारा आदिवासी समाज हा एकच आहे, त्या समाजाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी ओ टी एस पी मध्ये असलेल्या वाड्यां-पाड्याचा समावेश उपयोजने मध्ये करा नाही तर जिल्हा नियोजन ना मार्फत विशेष राखीव निधीचा कोठा मिळाला पाहिजे तरच या आदिवासी वाड्या-पाड्यांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होईल.

परंतु आजपर्यंत अशा प्रकारचो कुठलेही उपयोजना जिल्हा नियोजना मार्फत किंवा प्रशासन,शासना मार्फत करण्यात आलेली नाही म्हणून संघटनेची मागणी आहे की जिल्ह्यामध्ये असलेल्या सर्व आदिवासी वाड्या- पाड्या या आदिवासी उपयोजना,माडा ,मिनी माडा मध्ये समाविष्ट करा नाहीतर जिल्हा नियोजनामध्ये विशेष राखीव निधीची तरतूद करावी.ही विसंगती दूर केली तरच खऱ्या अर्थाने आदिवासींचा विकास होण्यास मदत होईल. आदिवासी उपयोजने मध्ये समाविष्ठ करा नाहीतर समाविष्ठ नसलेल्या वाड्यांना-पाड्यांना जिल्हा नियोजनात विशेष राखीव निधीचा कोठा मिळण्याची मागणी आदिवासी संघटनेच्या वतीने रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. आदिती तटकरे, रायगड जिल्हाधिकारी, रायगड जिल्हा नियोजन समिती, तसेच आदिवासी विकास प्रकल्प- पेण यांच्याकडे करण्यात आलेले आहे हे निवेदन देताना आदिवासी संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष मालू निरगुडे ,जिल्हा संघटनेचे सचिव हरेश वीर, खालापूर तालुका अध्यक्ष अंकुश वाघ, अलिबाग तालुका संघटनेचे सचिव काशिनाथ दरवडा आदी उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## श्री चंडिका ग्रामदेवीचा (पुनःदर्शन) महोत्सव उत्साहात साजरा

नवसाला पावणारी श्री.चंडिका अशी ख्याती असून दैवज्ञ(सोनार) समाजपारंपारिक पद्धतीने करीत असत. परंतु कालपरत्वे हा पुनःदर्शन सोहळा गावकऱ्यांनी करण्याचे ठरले. २०१३ साली मुर्तीला वज्र्यलेप करून पौष चतुर्दशी ते पौर्णिमा या दोन दिवशी साजरा करण्याचे ठरले यंदा हे दहावे वर्ष आहे. अतीशय शिस्तबद्ध, धार्मिक पध्दतीने, पावित्र्य, सामाजिक सलोखा बंधुत्व सर्वधर्म समभाव जपून बारा वाड्यातील भक्त श्री.चंडिका देवीचा ग्रामोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात पार पडत असतात. या उत्सवाची तालुक्यातील बारा वाड्यातील सर्व धर्मातील नागरिक मोठ्या आतुरतेने वाट पाहत असतात. मुंबई उपनगर, ठाणे पुणे येथून भाविक मोठ्या संख्येने दर्शन घेण्यासाठी येथे येत असतात दोन दिवस हा उत्सव असतो, असे महेंद्र बा.कजबजे-चंडिका देवी मंदिर ट्रस्ट अध्यक्ष यांनी सांगितले.

## भाजपची अवस्था पाण्यातून बाहेर पडून तडफडणाऱ्या माश्यासारखी

केला. खा. सुनिल तटकरे यांच्या हस्ते संभे, पालबुद्रुक, पुईत विविध विकासकामांचे भूमिपूजन व उदघाटन करण्यात आले. यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना तटकरें बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सुधागड, रोहा तालुक्यासह जिल्ह्यात विकासकामांची गंगा वाहत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला संघटनात्मक दृष्टया बळकटी व साथ देण्याचे काम माझ्या जुन्या ज्येष्ठ व युवा सहकाऱ्यांनी केले. मागील ३० ते ३५ वर्षाच्या राजकारण व समाजकारणात विविध पदावर काम करताना जनहीताची कामे करण्यावर भर दिला. या सर्व यशाचे मूळ माझ्या पुई व कोलाड पंचक्रोशी आहे. असे खा.तटकरें म्हणाले. कोव्हिडं काळात नागरिकांनी शासन नियमांचे काटेकोरपणे पालन करावे,स्वतः बरोबर कुटुंबाची देखील काळजी घ्यावी असे आवाहन खा.सुनिल तटकरे यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ नेते मोतीराम तेलंगे, राकेश शिंदे, महेश पोटफोडे, आंबेवाडी सरपंच सुरेशदादा महाबळे, संजय मांडुलसकर, अनंता सानप, सुनिल दळवी, नरेंद्र जाधव, मनोज शिर्के, रामचंद्र चितळकर, मंगेश सानप, महेश सानप, संजय सानप, रुपेश सानप , विलास सानप, होनाजी सानप, नारायण कडवं, नारायण दहिबेंकर, अनंता सानप, महादेव महाबळे, सुरेश महाबळे, बाळा महाबळे, निलेश महाबळे, मारुती लोखंडे, सदानंद महाबळे, बाळकृष्ण भालेकर, गणपत लोखंडे, शंकर महाबळे, लक्ष्मण महाबळे, विजय महाबळे, चंद्रकांत लहाने, विठ्ठल पवार, सरपंच सविता जाधव, उपसरपंच रोशनी लहाने, प्रवीण धामनसे, वृषाली मांडुलसकर, अशोक धामनसे, मधुकर दिसले, आदींसह संभे, पुई, मौजे पालेबुद्रुक येथील पक्षाचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ पादुकांचे आगमन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरात गावदेवी पाड्यावरील स्वामी समर्थ मध - मंदिरात गेल्या वीस वर्षा पासून अक्कलकोट येथून स्वामी समर्थांच्या पालखीचे आगमन होत असून या वर्षी सुद्धा समर्थांच्या पादुकांचे पनवेल शहरात आगमन झाल्यावर मठाधिपति सुधाकर घरत यांनी पालखीचे स्वागत केल्यावर श्री स्वामी समर्थांच्या पादुका दर्शना करिता पनवेल येथील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठात ठेवण्यात आल्या होत्या.

भारतासह देश विदेशात स्वामी समर्थांना मानणारा मोठा वर्ग आहे. पनवेल येथील स्वामी समर्थ मठ हे अनेक भाविकांचे श्रद्धास्थान आहे. स्वामी समर्थ मठाचे मठाधीपती सुधाकर घरत यांच्या मार्गर्दर्शना खाली गेल्या वीस वर्षा पासून अक्कलकोट येथून येणाऱ्या स्वामी समर्थांच्या पालखीचे नियोजन करण्यात येते.या वर्षी कोव्हिडमुळे अनेक धार्मिक कार्यक्रमाववर मर्यादा आल्या असल्याने सर्व नियम पाळत स्वामी पादुका दर्शना करण्याकरिता मठात ठेवण्यात आल्या होत्या. या वेळी भक्तिमय वातावरणात श्री स्वामी समर्थ महिला मंडळाने भजन गायली. त्याच बरोबर शेकडो स्वामी भक्तांनी स्वामी दर्शनाचा लाभ घेतला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पोलादपूरमध्ये आज मतदान कडक पोलीस बंदोबस्तात!

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्याचे शहर असलेल्या पोलादपूर नगरपंचायतीच्या निवडणुकीवेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस आणि प्रशासन सज्ज असून चार प्रभागातील मतदानावेळी कडक पोलीस बंदोबस्त आणि मतमोजणी–वेळी दंगलविरोधी पथक तैनात करण्याचा निर्णय झाल्याची माहिती महाराष्ट्र पोलीसांच्या गुप्तवार्ता विभागातर्फे देण्यात आली आहे.

आज मंगळवारी मतमोजणीसाठी २ पोलीस अधिकारी, ३५ पोलीसकर्मी आणि ४ वाहतूक पोलीस अशी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे तर मतमोजणीनंतर प्राप्त होणाऱ्या निकालावेळी ४ पोलीस अधिकारी ४० पोलीसकर्मी आणि २५ जवानांचे एक दंगलविरोधी पथक तैनात ठेवण्यात येणार आहे.

मतदान आणि मतमोजणीवेळी कोणताही अनुचित प्रकार अथवा घटना घडू नये, यासाठी गुप्तवार्ता विभागाने सतर्कता बाळगली असल्यानेच या यंत्रणेला पाचारण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीवेळी पोलादपूर नगरपंचायतीच्या मतदान प्रक्रियेत झालेल्या अनुचित घटनेमुळे अचानक मतदारांचा कौल बदलला होता. या पार्श्वभूमीवर त्रिशंकू अवस्था प्राप्त होण्याची शक्यता असलेल्या पोलादपूर नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील चार प्रभागांच्या निवडणुकीमध्ये असा अचानक कौल बदलू नये, यासाठी प्रशासन सतर्क असल्याचे दिसून येत आहे.

## काँग्रेसच्या डिजिटल सदस्य नोंदणीत जिल्ह्याला अव्वल आणणार : महेंद्र घरत

**दै.रायगड नगरी । खोपोली**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने डिजिटल सभासद नोंदणी अभियान सुरु केले आहे. या अभियाना अंतर्गत रायगड जिल्ह्यातील तालुका अध्यक्ष, शहर अध्यक्ष व पदाधिकारी यांची बैठक रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या अध्यक्षतेखाली शेलघर येथील समाजमंदिर हॉलमध्ये आज पार पडली.

प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी राष्ट्रीय काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना देशात महाराष्ट्र राज्य सभासद नोंदणीत एक नंबरचे राज्य असेल असे वचन दिले आहे. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातील युवकांना व महिलांना सभासद नोंदणीत मोठया प्रमाणात सहभागी करून राज्यात रायगड जिल्हा सभासद नोंदणीत अव्वल आणणार, असा निर्धार यावेळी रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी व्यक्त केला. जिल्हाध्यक्ष घरत यांनी सभासद नोंदणीसह पक्ष वाढीबाबत उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.




# प्रितम म्हात्रे यांच्या वाढदिवसा निमित्त विविध समाजपयोगी कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काही व्यक्तिमत्त्व अशी असतात की ज्यांच्यां सत्कार्याचा नंददीप हा आपल्या स्वस्ताच्या पायापुरता प्रकाश निर्माण न करता दुसऱ्यांच्या जीवनातील अंधारलेल्या वाटा कश्या प्रकाशित करता येतील ह्याच भावनेतून आपलं सर्वस्व अर्पण करत असतात. आणि ...असचं एक खास दिलदार ..आणि.. दिलखुलास व्यक्तिमत्त्व .... सामाजिक कार्यातील महामेरू, तरुणांच्या गळ्यातील ताईत ...अर्थात...जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था पन–वेलचे... संस्थापक अध्यक्ष ...आणि .... पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते डॉ. प्रितमदादा जनार्दन म्हात्रे ...यांचा आज अभिष्टचिंतन सोहळा...आजचा दिवस खऱ्या अर्थाने ...अनेक समाजपयोगी कार्यांच्या पर्वणीचाच दिवस म्हटलं तर वावगं ठरणारं नाही ! कारण दादांच्या... ह्या वर्षीच्या जन्मदिनी दूर–दुर्गम डोंगर दऱ्यांत, वाडी– वस्तीवर राहणाऱ्या माझ्या आदिवासी बांधवांकरिता एक सपानोकीं सौगत घेऊन आले ते ...प्रितमदादा म्हात्रे ...यांच्या औदार्यातून त्या आदिवासी बांधवांकरिता खास अशी भेंट मिळाली ती म्हणजे ह्या आदिवासी बांधवांच्यां वाडी वस्तीवरचा खडतर असणारा दळणवळणाचा मार्ग (रस्ता) त्यावरून होणारा जीवघेणा प्रवास आणि त्यातच एखादी महिला भगिनी किंवा आदिवासी बांधव आजारी किंवा अपघात ग्रस्त झाला तर त्याला रुग्णालया पर्यंत पोहचविणे म्हणजे एक दिव्यच असते.!...आणि म्हणूनच या आदिवासी बांधवांचं हे दुःख आणि व्यथा पाहून ... डॉ प्रितमदादा म्हात्रे यांच्या औदार्यातून ...रानसई उरण येथील आठ आदिवासी वाड्यांकरिता नवीन ...रुग्णवाहिका... देण्यात आली आहे आणि त्या रुग्णवाहिकेचा ...लोकार्पण सोहळा ...पार पडला. सोबतच त्या वाडी– वस्तीवरील दीडशे असंघटित कामगार आदिवासी बांधवांनां



...विनामूल्य ई– श्रम कार्ड बनवून दिली आणि खास करून ह्या आदिवासी बांधवांचीं शान म्हणजे आपल्या विभागच नावं अर्थात ...रानसई...या नावाचं आकर्षक अश्या पद्धतीनं स्टील मेटलने भव्य,सुंदर, आकर्षक असं ...आय लव्ह रानसई असं नावं बनवून ह्या नामं फलकाचं अनावरण सुद्धा करण्यात आले.

त्याच बरोबर केअर ऑफ़ नेचर सा.संस्थेचे संस्थापक... रायगड भूषण ...राजू मुंबईकर यांच्या संकल्पनेतून ...वेश्वी एकविरा मंदिर डोंगर .. पायथ्याशी ...रॉक ऍनिमल पार्क ह्या ...रॉक पार्क... मध्ये वाघ, वासरू, हरीण, मोर, कोंबडा अश्या विविध प्रकारच्या प्राणी, पक्षांचे पुतळे बसवून तिथे फिरायला येणाऱ्या पर्यटकांकरिता मनोरंजन पार्क बनविण्यात आले आहे आणि या रॉक ऍनिमल पार्कचं सुद्धा आज ह्या शुभ प्रसंगी उद्घाटन करण्यात आले.

सोबतच ह्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त पनवेल आपटा विभागातील सारसाई, बागेचीवाडी, गोविंदाचीवाडी, रामवाडी ह्या आदिवासी वाड्यांवरील आदिवासी बांधवाना नारळपाणी, रिअल फ्रुट ज्यूसच्या बॉटल्सचं वाटप त्या मतदार संघाचे कार्यसम्राट रा.जि.प.सदस्य ज्ञानेश्वर घरत व रायगड भूषण राजू मुंबईकर यांच्या संकल्पनेतून करण्यात आले. ह्या सुंदर आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचं सूत्रसंचालन निवेदन क्षेत्रातील रायगडची बुलंद तोफ ..., प्रख्यात निवेदक नितेश पंडित यांनी आपल्या ओघवत्या भाषण शैलीत केलं तर त्यांना साथ दिली ती त्यांचे शिष्य आणि निवेदन क्षेत्रातलं एक आद–राने घेतलं जाणारं नावं आणि गोवठणे विकास मंचचे अध्यक्ष सुनिल वर्तक यांनी तर मुंबईचे सामाजिक कार्यकर्ते ...नारायण माने यांनी त्या आदिवासी चिमुकल्यांकरिता खास खाऊ म्हणून सोनपापडीचीं पाकिटं आणली होती ती वाटण्यात आली सोबतीला रिअल फ्रेश फ्रुट नारळपाण्याच्या बॉटल्स देखील वाटप करण्यात आल्या. रायगड भूषण ... राजू मुंबईकर यांच्या संकल्पनेतून व जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था पनवेल आणि ... केअर ऑफ़ नेचर सा .संस्था, गोल्डन ज्युबली मित्र मंडळ सारडे व मित्र परिवार ह्या सामाजिक मंडळांच्या सहकार्यातून साकारलेल्या ह्या प्रितमदादा म्हात्रे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या प्रसंगी आणि ...रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा, ई– श्रमकार्ड वाटप, आय लव्ह रानसई नामफलक अनावरण सोहळ्याप्रसंगी आणि ...खास करून ...रॉक ऍनिमल पार्क उद्घाटन सोहळ्याच्या कार्यक्रमा प्रसंगी ...प्रमुख सत्कारमूर्ती होते ते ...ज्यांच्या औदार्यातून ह्या आदिवासी बांधवांना आज पर्यंत डाबर ह्या नामांकित कंपनीचे लाखों रुपये किंमतीचे रिअल फ्रेश फ्रुट ज्यूस, डाबर किड्स शाम्पू, वाटीका शाम्पू, हेअर ऑईल, गुलाबपाणी, रिअल फ्रेश नारळपाणी बॉटल्स, कोरोना किट्स अश्या प्रकारचे समान मिळालं ते ...डाबर कंपनीचे मॅनेजर... रमेश मारुतीराव पवार आणि ...श्री समर्थकृपा सखी स्वयंसहाय्यता संस्थेच्या ...संस्थापक सौ.संगिताताई ढेरे व... ज्ञानेश्वरदादा घरत (विद्यमान रा.जि.प.सदस्य), अनंताशेठ म्हात्रे (सामाजिक कार्यकर्ते पनवेल), भारत भोपी (उपाध्यक्ष – आगरी, कोळी, कराडी सं.संस्था), नारायण माने (सामाजिक कार्यकर्ते मुंबई), प्रदीप पाटील (नेरे विभाग अध्यक्ष – आगरी, कोळी,कराडी सं.संस्था), झाकीरदादा काकर, श्याम लेंडे ( सामाजिक कार्यकर्ते रानसई), विलास ठाकूर (सेक्रेटरी कॉन) अनिल घरत (उरण तालुका सचिव– आगरी, कोळी, कराडी संस्था), हिराचंद म्हात्रे (उपाध्यक्ष –गोल्डन ज्युबली मित्र मंडळ), देवीदास पाटील (कार्याध्यक्ष गोल्डन ज्युबली मंडळ), जितेंद्र म्हात्रे (गोल्डन ज्युबली मंडळ), नितेश मुंबईकर, संपेश पाटील (अध्यक्ष – मित्र परिवार), रोशन पाटील (उपाध्यक्ष मित्र परिवार), क्रांती म्हात्रे (कार्याध्यक्ष मित्र परिवार), गोपाळ म्हात्रे (आंतरराष्ट्रीय कराटे कोच), समाधान पाटील (समाज कार्यकर्ते पिरकोन), कु.केतन म्हात्रे...आणि ...सोबतच रानसई प्राथमिक शालेच्या शिक्षिका सौ.कडू, सौ. ठाकूर मदतनिस ... कु.कविता आणि रानसई येथील आठ आदिवासी वाड्यांवरील आदिवासी बांधव, महिला भगिनीं, विद्यार्थीवर्ग यांच्या उपस्थितीत हा अनोखा आणि प्रेरणादायी कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

## निराधार वृद्ध महिलेला समाजसेवक कृष्णा महाडिक यांनी दिला आधार

**दै.रायगड नगरी । तळा**

ज्याच्या मागे कोण नसते त्याच्या मागे परमेश्वर असतो याची प्रचिती एका वृद्ध महिलेला आली आणि सदर वृद्ध निराधार महिलेला समाजसेवक कृष्णा महाडिक यांनी आधार दिला आहे. रविवार दिनांक १६ जानेवारी २०२२ रोजी मौजे कुडतूडी तालुका म्हसळा जि. रायगड येथील श्रीमती शेवंती पांडूरंग गायकर या गरीब महिलेला सर्वात सुंदर निवास( घरकुल) समाजसेवक कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नातून मिळाले आहे. ३ जून २०२० रोजी कोकणात झालेल्या चक्रीवादळामुळे या माऊलीचे संपूर्ण घर उध्वस्त झाले .त्यामुळे निवाऱ्याअभावी राहायचे कुठे, असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला होता. डोक्यावरच छप्पर नसल्याने त्या निराधार झाल्या होत्या. गेली दिड वर्ष या महिलेला सरकार कडून काहीही मदत मिळाली नाही.पतीच्या मृत्यू नंतर या अनाथ महिलेला दैनंदिन



जीवन जगणे अशक्य झाले होते. अशा वेळी समाजसेवक कृष्णा महाडिक यांच्या संपर्कातून निधी उपलब्ध झाला असून या घरकुलाचे उद्घाटन करण्यात आले.

या घरकुलाचे उद्घाटन व गृहप्रवेश उद्योगपती विजय नागरथ, उद्यो–गपती कमलेशभाई मेहता व मुन्नाभाई एमबीबीएस चित्रपटातील सिनेकलाकार भोमी धोतीवाला ( पप्पा) यांच्या हस्ते करण्यात आले या पूर्वी घरकुलाचे भूमिपूजन म्हसळा पोलिस निरीक्षक उद्धव सुर्वे यांच्या हस्ते करण्यात आले होते या शुभ प्रसंगी समाजसेवक कृष्णा महाडिक, रमेश कासार, रमेश दिवेकर, प्रकाश धुमाळ, विनोद लाड उपस्थित होते. या सुंदर वास्तूचे काम मेस्त्री अनंत पांचाळ ( नालासोपारा यांनी एका महिन्यात पूर्ण केले.अशा प्रकारे एका गरीब गरजू व निराधार महिलेला कायम स्वरुपी निवाऱ्याची व्यवस्था झाल्याने समाजसेवक श्री कृष्णा महाडिक यांचे ग्रामस्थ मौजे कुडतूडी , पंचक्रोशी तसेच जिल्ह्यातून आभार व्यक्त केले जात आहेत.

## वरवठणे येथील रस्त्यांचे आ.रविशेठ पाटील यांच्या हस्ते उद्घाटन व भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

महाराष्ट्र शासनाच्या खनिकरण योजनेअंतर्गत नागोठण्याजवळील वरवठणे येथे श्री चौंडेश्वरीमाता मंदिर ते वडापर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचे (२.९९ लाख रु.) उद्घाटन व डोंगरी विकास योजने अंतर्गत वडापासून ते सुभाष म्हात्रे यांच्या घरापर्यंतच्या रस्ता काँक्रिटीकरण कामाचे (२.९९ लाख रु.) भूमिपूजन भाजपचे पेण – सुधा–गड विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील यांच्या शुभहस्ते रविवार दि. १६ जानेव–ारी रोजी सायंकाळी पाच वाजता वरवठणे येथे संपन्न झाले.

यावेळी या कार्यक्रमाप्रसंगी भाजपाचे नेते श्रीकांत हिराजी पाटील, वरवठणे सरपंच ऋतुजा गणपत म्हात्रे, भाजपा माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोरभाई म्हात्रे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष मारुती देवरे, रविशेठ पाटील यांचे खंदे समर्थक सुभाष पाटील, संतोष लाड, श्रीकांत पाटील, नामदेव मढवी, ग्रा.पं सदस्य गणपत म्हात्रे, सदस्या रेवती गोकुळ पाटील, पुष्पा म्हात्रे, दत्ताराम करजेकर, माजी उपसरपंच हरिशचंद्र म्हात्रे, भाजपाचे युवा नेते मोरेश्वर म्हात्रे, नथुराम पाटील, गोकुळ पाटील, संतोष म्हात्रे, ऋषिकेश पाटील, भूषण म्हात्रे, दयाराम म्हात्रे, कृष्णा म्हात्रे, रमण म्हात्रे, जीत डिसोजा आदींसह ग्रामस्थ यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.


## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### जाहीर ई–निविदा सूचना

निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/२३२१/प्र.क्र.१०/११५/२०२२ दिनांक : १७/०१/२०२२

**शुद्धीपत्रक–१**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | PMC/CE/258/2021-22 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ''अ'' प्रभाग क्र.०४, खारघर येथील सेक्टर–२१, भूखंड क्रं.१५१ येथे महापौर निवासस्थान बांधणे |

या कामाच्या ई–निविदेच्या शुद्धीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१८/०१/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निवदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
अतिरिक्त आयुक्त–I
पनवेल महानगरपालिका


## दोन दिवसांची पोलिस कोठडी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

कोणतीही आवश्यक ती कागदपत्रे जवळ नसतांना गोवंश जातीच्या प्राण्यांची बेकायदेशीरपणे कत्तल करून ते मांस अवैधरीत्या मुंबई येथे विक्रीसाठी नेणाऱ्या पाच जणांच्या टोळीला नागोठणे पोलिसांनी रविवारी (दि.१६) पहाटे जेरबंद केले होते. या पाच आरोपींना सोमवार दि. १७ जानेवारीला रोहा येथील कनिष्ठ स्तर दिवाणी व फौजदारी न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## क्रिकेटचे सामने आयोजित केल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विनापरवाना क्रिकेटचे सामने आयोजित करून नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात चंद्रकांत महादु भोईर (वय ४४, भाताण) यांच्याविरोधात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम ५१ ब अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोविड १९ पॉझिटिव रुग्णांची तसेच ओमायक्रोन बाधित रुग्णांची संख्या वाढत असून संसर्गजन्य आजाराचा जोराने फैलाव होत आहे. या रोगाचा प्रसार रोखण्यासाठी शासनाने सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम करण्यास ५० पेक्षा जास्त व्यक्तींना मनाई केली आहे. पनवेल तालुक्यातील भाताण येथील खेळाच्या मैदानावर क्रिकेटचे सामने आयोजित करून मोठ्या संख्येने नागरिक जमल्याची माहिती तालुका पोलिसांना मिळाली. यावेळी पोलीस तेथे गेले असता त्या ठिकाणी खेळाच्या मैदानावर क्रिकेटचे सामने चालू होते. जवळपास दीडशेहून अधिक नागरिक गर्दी करून कोविड १९ या रोगासंदर्भात जारी केलेल्या मनाई आदेशाचा भंग करून सामने पाहत होते. पोलीसाना पाहिल्यानंतर नागरिक पळून गेले. यावेळी क्रिकेटच्या सामन्याची परवानगी घेतली नसल्याचे पोलिसांना समजले. तालुका पोलिसांनी चंद्रकांत महादेव भोईर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.


मा.पांडे साहेब कोर्ट

ॲड.राजेश बांगर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग मा.न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.५२/२०२२

श्री.बाळाराम दिनकर कोंडीलकर
वय : ७५ वर्षे, धंदा : शेती
रा.जांभिवली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक
ग्रुपग्रामपंचायत जांभिवली,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असून त्यांच्या आई कै.चंद्रभागा दिनकर कोंडीलकर यांचा मृत्यू दि.०१/०८/१९९४ रोजी मौजे : जांभिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांचे राहते घरी झाला आहे. त्याबाबत अर्जदार यांनी मृत्यूचा दाखला मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जदारांचे मागणीप्रमाणे त्यांच्या मृत्यूचा दाखला देणेस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलांमार्फत दि.२१/०२/२०२२ पर्यंतचे आत लेखी हरकत दाखल करावी.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या आईचा मृत्यूदाखला देणेबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल याची दखल घ्यावी.

आज दि.१७/०१/२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



### जाहीर नोटीस

आमचे अशिल सौ.वैशाली शशिकांत म्हात्रे रा.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी खालील मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे मान्य केले आहे. खालील वर्णनाची मिळकत १) श्री.जगन्नाथ बामा धोंगडे, २) श्री.यशवंत बामा धोंगडे, ३) श्री.गुरुनाथ बामा धोंगडे रा.मौजे : वावंजे, ता.पनवेल यांच्या ताबेकब्जात असल्याने त्यांचेकडून आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड | ७७ | १/अ | ०–१८–०० पैकी ०–१०–०० |

तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा–कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०१/२०२२

सही/–
ॲड.छाया रामदास म्हात्रे
ग्राऊंड फ्लोअर, दत्तछाया अपार्टमेंट,
पायोनिअर सोसायटी, स्वामी नित्यानंद रोड,
युविका हॉटेल समोर, पनवेल–४१०२०६
मो.नं.९६१९२७६००३



मा.पांडे साहेब कोर्ट

श्री.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.७७/२०२२
ने.ता.२२/०२/२०२२

श्री.बळवंत रावसाहेब गहवाणे
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.अमनदिप बिल्डींग, प्लॉट नं.२२३,
रुम नं.५०१, सेक्टर १३, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कुमारी कु.प्रिती बळवंत गहवाणे हिचा जन्म दि.२०/०८/२०१६ रोजी अमनदिप बिल्डींग, प्लॉट नं.२२३, रुम नं.५०१, सेक्टर–१३, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनवधानाने कु.प्रिती बळवंत गहवाणे यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणीबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.१७/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत १) श्रीमती.ताई गोपिनाथ भोईर २) श्री.हनुमंत गणपत जाधव रा.खानाव, ३) श्रीमती.मैनाबाई अनंत बडेकर रा.महाळुंगी, ता.पनवेल यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खानाव, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| खानाव | २६ | २ | ०–१९–७ पो.ख.०–०२–८ एकूण ०–२२–५ | ४–०० |

मौजे : खानाव, ता.पनवेल, जि.रायगड येथील वरील मिळकतीचे जमीन मालकांनी सदरची शेतजमीन मिळकत श्री.शशिकांत मारुती दिसले यांना कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विक्री करण्याचे ठरविले आहे.

सदर वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे असे समजून मी वर नमूद जमीन मालक / कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०१/२०२२

सही/–
ॲड.शशिकांत मारुती दिसले
शॉप नं.१, कमलेश संकुल, प्लॉट नंबर ८५, को.ऑप.हौसिंग सोसायटी, नवीन कोर्टाचे मागे, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.९९३०३०२१००

# संक्षिप्त...

## अनधिकृत संस्था चालवण्याप्रकरणी गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

खारघर येथे अनधिकृत संस्था चालून १९ अल्पवयीन मुलींच्या निवासाची व्यवस्था केली म्हणून खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर, सेक्टर १२ येथे जीवन सच सामाजिक संस्था अनधिकृतपणे चालविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विनीत म्हात्रे यांना समजली होती. त्यानुसार संस्थेत जाऊन पाहणी केली असता एकूण २४ मुलींना संस्थेत निवासी ठेवून त्यांची देखभाल करून त्यांना शाळेत पाठवून शिक्षण पूर्ण करण्याचे काम होत असल्याचे आढळून आले. यावेळी सनी अँड्रूज यांना जीवन सच संस्थेने बाल न्याय अधिनियम २०१५ अंतर्गत मान्यता प्रमाणपत्र घेतले आहे का याची विचारणा केली. या वेळी कोणतेही प्रमाणपत्र त्या सादर करू शकले नाहीत. २४ मुलींपैकी १९ मुली या अल्पवयीन असल्याने त्यांना मान्यताप्राप्त संस्था खारघर येथे सुरक्षित निवाऱ्या करता ठेवण्यात आले.

सनी याना संस्थेची कागदपत्रे सादर करण्यास मुदत देण्यात आली होती. मात्र त्यांनी प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यामुळे सनी अँड्रूज आणि जीवन सच संस्था यांनी बालकल्याण विभागाकडे नोंदणी करणे बंधनकारक असताना तसे कोणतेही नोंदणी न करता अनधिकृत संस्था चालवली. त्यामुळे खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## वाढत्या ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुका पोलिसांची धडक कारवाई

दै.रायगड नगरी । पनवेल

वाढत्या ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर त्याच्याशी दोन हात करण्यासाठी पनवेल तालुका पोलिसांनी त्यांच्या हद्दीमध्ये धडक मोहिम राबवून कायद्याचे उल्लंघन करणार्यांविरुद्ध वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी कारवाई सुरूवात केली आहे.

त्या अनुषंगाने त्यांनी त्यांच्या हद्दीमध्ये विविध पथके स्थापन केली आहेत. त्यानुसार रात्री उशिरापर्यंत हॉटेल व्यवस्थापन, पान टपर्या, चायनिज गाड्या आदींची विक्री करणार्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. तसेच मास्क न घालणे, जास्त गर्दीचे लोक जमविणे, क्रिकेट सामने भरविणे यांच्या विरोधात सुद्धा भादवी कलम १८८ अन्वये कारवाई केली आहे.

नागरिकांनी शासनाने दिलेल्या आदेश व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा कारवाईचा बडगा उगारावा लागेल, असे वपोनि रवींद्र दौंडकर यांनी सांगितले.

# खा.तटकरे कोकणचे भाग्यविधाते नसून कुटुंबियांचे : आ.भास्कर जाधव

दै.रायगड नगरी । तळा

तळा नगरपंचायत निवडणूक चार जागांसाठी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी मतदारांना संबोधित करताना चिपळूणचे शिवसेनेचे आ.भास्कर जाधव यांनी खासदार सुनील तटकरे यांना हे कोकणचे भाग्यविधाते नाहीत तर सगे सोयरे आणि कुटूंबियाचे भाग्यविधाते आहेत अशी बोचरी टीका केली. या जाहीर प्रचार सभेसाठी आ.भरतशेठ गोगावले, जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, माजी जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, तालुका प्रमुख प्रदुम्न ठसाळ, माजी उपनगराध्यक्षा सायली खातू, शहरप्रमुख राकेश वडके शिवसैनिक डॉ. मनोज पाथरे लिलाधर खातू,महीला संघटक स्मिता पाडळकर, शिल्पा चोरगे नमीत पांढरकामे आदी मान्यवर उपस्थित होते.



आ.भास्कर जाधव पुढे म्हणाले की शिवसेना हा पक्ष नसून संघटना आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे ८०% समाजकारण २०% राजकारण करते.सेनेने १७ जागांवर उमेदवार उभे केले असून एक जागा बिनविरोध निवडून आणली आहे हि विजयाची नांदी आहे.उरलेल्या१२जागांवर देखील विजय होणार याची खात्री असून ४ जागेसाठी होत असलेल्या उमेदवारांना विजयी करून पुन्हा नगरपंचायतीवर भगवा फडकवा असे आवाहन करून शहराच्या नियोजनबध्द विकास केला जाईल असे आश्वासन दिले. महाराष्ट्रात काम करण्यासाठी मला कोणत्या जिल्ह्याची निवड करायची झाली तर मी रायगड जिल्ह्याची निवड करेन. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मला संघटनात्मक काम करण्यासाठी रायगड जिल्हा दिला तर मग मी माझी ताकत दाखवतो असा ईशारा आमदार भास्कर जाधव यांनी खा. सुनील तटकरे यांचे नाव न घेता दिला.विजयी सभेला आमंत्रीत केले तर जरूर येईन. असे देखील पदाधिकाऱ्यांना सांगितले.

भाजप बांडगुळा सारखा शिवसेनेच्या ताकदी वर वाढणारा पक्ष आहे गल्ली पासून दिल्ली पर्यंत शिवसेनेने भाजपला मोठे केले.आणी गद्दारी केली याचा अर्थ छुप्या पध्दतीने खंजीर खुपसते भाजप लबाड पक्ष आहे अशी जहर टीका केली. खा.तटकरे स्वतःला कोकणचेभाग्यविधाते म्हणवितात मग त्यांना घरोघरी जाऊन मते मागण्याची वेळ का येते. तुम्ही जर जनतेची कामे केली असतील तर जनता तुम्हाला निवडून देईल परंतु केवळ आश्वासन देऊन मते मिळत नाहीत त्यासाठी जनतेची कामे करावी लागतात. असा टोला आमदार. गोगावले यांनी खा.सुनील तटकरे यांना लगावला.

तसेच तळा, म्हसळा, माणगाव, पोलादपूरनगर पंचायतीवर शिवसेनेचीच सत्ता येईल असा विश्वास देखील आ. भरत गोगावले यांनी यावेळी व्यक्त केला. भाजप प्रदेश सचिव यांनी मुलाला पक्षाच्या चिन्हावर उभे न करता अपक्ष म्हणून उभे केले यावरून काय ते समजून जा. त्यांची निशाणी कपबशी असून धनुष्यबाणाने कपबशी फोडून टाका असे भावनिक आवाहन केले.

# पोलादपूर तालुक्यातील लोहारेत विदेशी मद्याचा साठा ; ३.८५ लाखांचा मुद्देमाल जप्त

दै.रायगड नगरी । पोलादपूर

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथून भरधाव वेगाने महाडच्या दिशेने गेलेल्या गोवा राज्यनिर्मित देशी विदेशी दारूचा मोठा साठा घेऊन निघालेल्या मारूती ऑम्नी कारचा पाठलाग करताना अचानक मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरून आडरस्त्याला कार गेली आणि पोलादपूर तालुक्यातील तुर्भे पुलाजवळ लोहारे गावाच्या हद्दीमध्ये एका गोडाऊनमध्ये मुद्देमाल उतरविताना राज्य उत्पादन शुल्क महाड विभागाच्या अधिकाऱ्यांनी चाणाक्षपणे धाड घालून मारूती ऑम्नी कारसह ३.८५ लाखांचा मुद्देमाल जप्त करताना दोन व्यक्तींनाही अटक केल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

महाड राज्य उत्पादन शुल्क विभागास खात्रीशीर खबर मिळाल्यावरून पोलादपूर येथे एका वाहनावर पाळत ठेवण्यात आली होती. शनिवार, दि.१५ जानेवारी २०२२ रोजी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास चिपळूणच्या दिशेने एक मारूती ऑम्नी कार (एमएच ०८ सी ०२३०) निघालेली पाहून अडविण्याचा प्रयत्न केला असता कार वळसा घेत पुन्हा महाडच्या दिशेने भरधाव वेगाने निघाली. या भरधाव कारचा पाठलाग केल्यानंतर ही व्हॅन अचानक पोलादपूर ते महाडदरम्यान लोहारे गावापासून तुर्भे पुलाकडे गेल्याची माहिती मिळाल्यानुसार शोध घेतला असता कारमधील मुद्देमाल एका गोडावूनमध्ये उतरविण्याचे काम सुरू झाल्याचे दिसून आले. यावेळी राज्य उत्पादन शुल्काच्या महाड विभागाने हा मुद्देमाल ताब्यात घेताना मारूती ऑम्नी व्हॅन आणि गोल्ड अ‍ॅण्ड ब्लॅक रम ७५० मिली क्षमतेच्या ३६ बाटल्या, ब्लू सेव्हन व्हिस्की ७५० मिली क्षमतेच्या ४८ बाटल्या, गोल्डन एस व्हिस्की ७५० मिली क्षमतेच्या ४५६ बाटल्या असा ३ लाख ८५ हजार रूपये किंमतीचा माल जप्त केला.

यावेळी रेवतळे,चिपळूण येथील व्यंकटेश मधुकर महाडीक वय ३९ आणि कुंभारआळी महाड येथील रमेश अनंत गायकवाड वय ४८ या दोघांना ताब्यात घेऊन महाराष्ट्रामध्ये प्रतिबंधित असलेल्या गोवा विदेशी मद्याचे ४५ बॉक्स जप्त करण्याच्या कारवाईनंतर महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा १९४८ चे कलम (अ,ई) ८०,८१,८३ व १०८ अन्वये कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये निरिक्षक प्रवीण सोनावणे, दुय्यम निरिक्षक शंकर जाधव तसेच जवान सुरेंद्र महाले आणि चेतन भोई यांनी सहभाग घेऊन कारवाई यशस्वी केली.

# केगाव ग्रामपंचायत हद्दीत पिण्याच्या पाण्याची वाणवा

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायती मध्ये जनतेची कामे वेळेवर होत नसल्याने तसेच गेली ३ वर्षे ग्रामसभाच झाली नसल्याने व जनतेच्या समस्यांकडे केगाव ग्रामपंचायत जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याने केगाव ग्रामपंचायती विरुद्ध स्थानिक ग्रामस्थ, नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. जर या समस्या सुटल्या नाहीत तर केगाव ग्रामपंचायतीच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थ, नागरिकांनी केगाव ग्रामपंचायतला दिला आहे.

केगाव ग्रामपंचायत हद्दीत अनेक समस्या आहेत. मात्र त्या समस्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायतकडे वेळच नसल्याने त्या समस्या अनेक वर्षे तशाच आहेत. त्या समस्या सोडविण्याकडे ग्रामपंचायतचे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. असा आरोप स्थानिक नागरिक उघडपणे करीत आहेत. केगाव ग्रामपंचायत हद्दीत पिण्याच्या पाण्याची वाणवा असून सदर ग्रामपंचायत तर्फे १५ ते २० दिवसांनी तेही एकदाच पाणी सोडले जाते. पिण्याचे पाणी सुद्धा मिळणे नागरिकांना मुश्किल झाले आहे. पिण्याच्या पाण्याचे कोणत्याही प्रकारे नियोजन नाही. कोणत्याही वेळेत पाणी सोडले जाते. शिवाय पिण्याचे पाईपलाईन अनेक ठिकाणी फुटली आहे. त्याच्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्या ऐवजी तात्पुरते रबर पॅच बांधले जाते. ते पुन्हा पुन्हा पाईप फुटते व हजारो लिटर पाणी वाया जाते. अनेक ठिकाणी वॉलव सुद्धा उघडे आहेत. त्याच्यावर झाकणच नाहीत. त्यामुळे हजारो लिटर पाणी रस्त्याद्वारे, नाल्याद्वारे वाया जात आहे. एकतर लोकांना १५ ते २० दिवसांनी एकदा पाणी येते. आणि त्यातच केगाव ग्रामपंचायतीच्या नियोजन शून्य कारभारामुळे हजारो लिटर पाणी वाया जात आहे. वॉलव उघडे असते. या वॉलवर कुत्रे, मांजरे, बेडूक, साप आदी विषारी जंगली प्राणी तिथे येऊन आपली विष्टा टाकतात. पाणी घाण करतात आणि तेच पाणी नागरिकांना पिण्याचे पाणी म्हणून सोडले जाते. यातून नागरिकांना विषबाधा होण्याची दाट शक्यता आहे.पिण्याचे पाणी सोडण्यासाठी, नळ सोडण्यासाठी तसेच वॉलव फिरविण्यासाठी अनुभवी, तज्ञ व्यक्तीद्वारे पाणी न सोडता मिळेल त्या व्यक्तीला नळाचे काम करण्यास सांगितले जाते. वॉलव फिरविण्यास, पाणी सोडण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला सांगितले जाते. त्याचेही कोणतेही नियोजन नसते. नागरिकांनी स्थानिक ग्रामस्थांनी विविध समस्ये संदर्भात ग्रामपंचायतला कळवून सुद्धा अनेकदा निदर्शनास आणून सुद्धा ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक या विविध समस्यांकडे जाणून बुजून दुर्लक्ष करतात असा आरोप गावातील ग्रामस्थ अक्षय पाटील, आतिष हुजरे, प्रवीण पाटील, मृणाल पाटील, प्रेरणा पाटील, विनोद पाटील आदींनी केला आहे.



# पनवेलच्या रोहिदास वाड्यातील कामांची सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी



दै.रायगड नगरी । पनवेल

शहरातील रोहिदास वाडा येथे महापालिकेच्या वतीने समाज मंदिर उभारण्याचे काम सुरू आहे. या समाजमंदिराच्या कामाची महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अधिकार्यांसह पाहणी केली. या वेळी त्यांनी या कामाचा आढावा घेऊन अधिकार्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या, तसेच या वेळी त्यांनी परिसरातील गटारे आणि रस्त्यांच्या कामाचीही पाहणी केली.

पनवेल महापालिकेमार्फत अनेक विकासाची कामे महापालिका क्षेत्रात सुरू आहेत. त्यानुसार प्रभाग क्रमांक १९मधील रोहिदास वाडा येथे समाजमंदिर उभारण्याचे काम सुरू आहे. या मंदिराच्या कामाची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पाहणी करून आढावा घेतला, तसेच या वेळी त्यांनी आजूबाजूच्या परिसरातील गटारे, अशोका गार्डन परिसरातील गटारांची पाहणी, तथास्तू हॉलजवळील परिसरातील रस्त्याची कामे आणि पंचरत्न सर्कल येथील नाल्याची पाहणी अधिकार्यांसोबत केली.

या वेळी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, शहर अभियंता संजय कटेकर, आरोग्य निरीक्षक संजय जाधव, भाजप प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, प्रवीण मोहोकर, मधुकर उरणकर, बाबाया जाधव, रजनिस जाधव, सचिन उरणकर, मंगेश पिळविलकर, सुधीर कटेकर आदी उपस्थित होते.

# आगरदांडा गावातील रस्ता ते नांदले रस्ता दुरुस्त न झाल्यास आंदोलनाचा इशारा

## मुरुड-जंजिरा कुणबी समाज उन्नती संघातर्फे सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन

दै.रायगड नगरी । कोर्लई

गेल्या अनेक वर्षांपासून मुरुड तालुक्यातील आगरदांडा गावातील रस्ता ते नांदले रस्त्याची पार दुरावस्था झालेली असून प्रवासी, वाहनचालक व ग्रामस्थांना होणारा त्रास लक्षात घेऊन तातडीने या रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण करण्यात यावे. अन्यथा या विरोधात आंदोलना शिवाय पर्याय राहणार नाही.असा इशारा मुरुड-जंजिरा कुणबी समाज उन्नती संघातर्फे आपल्या सहकाऱ्यांसमवेत तालुका अध्यक्ष संतोष पाटील यांनी दिला असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता अक्षय माने यांना एक निवेदन सादर करण्यात आले आहे.



सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मौजे खार आंबोली ते आगरदांडा गावाजवळ (अदानीपोर्ट प्रवेशद्वाराजवळ) रस्त्याचे रुंदीकरण व कॉंक्रिटिकरण करण्यात आले असून आगरदांडा गावातून जाणारा मुख्य रस्ता दुरावस्थेत असून मागील सन.२०१७ पासून सातत्याने दुरुस्ती बाबत आपल्या कार्यालयाकडे निवेदनाद्वारे संपर्क साधून ही आजतागायत रस्ता दुरुस्त झालेला नाही.

सदर रस्ता कार्पेट टाकून खड्डे भरून सदर रस्त्यावर नुतनीकरणाचे काम करण्यात येईल.असे आपल्या कार्यालयाकडून सांगण्यात आले होते मात्र अद्यापही या रस्त्याच्या दुरुस्तीचे, नुतनीकरणाचे काम सुरू झालेले नाही. आगरदांडा गावातून जाणारा रस्ता संपुर्णपणे नादुरुस्त झालेला असून रस्त्यावर टू-व्हिलर, थ्रि-व्हिलर व अन्य वाहने चालवताना कसरत करावी लागत असून हाल व त्रास सहन करावा लागत आहे.वेळप्रसंगी या रस्त्यावर अपघाताला सामोरे जावून मोठी जिवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाने तसेच संबंधित ठेकेदाराने वेळीच लक्ष पुरवून या रस्त्याचे काम तातडीने करण्यात यावे.अन्यथा याविरोधात नांदले-मिठागर परीसरातील ग्रामस्थांना उपोषण आंदोलना शिवाय पर्याय राहाणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.असे मुरुड जंजिरा कुणबी समाज उन्नती संघातर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून सदर निवेदनाच्या प्रती मुरुड तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना देण्यात आल्या आहेत. मुरुड जंजिरा कुणबी समाज उन्नती संघाचे तालुकाध्यक्ष संतोष पाटील, मनोहर वासकर,लक्ष्मण पाटील,रामा आरकर, रमेश पाटील, जयवंत तळेकर यावेळी उपस्थित होते.

# झुकलेल्या विद्युत पोलामुळे नागरिकांच्या जीवाला धोका ; वीज वितरण कंपनीचे दुर्लक्ष




दै.रायगड नगरी । पनवेल

शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सावरकर चौक परिसरात असलेले वीज वितरण कंपनीचे विद्युत पोल हे गंजलेले व एका बाजूला झुकले गेल्याने ते कधीही तेथून ये-जा करणार्या लोकांच्या अंगावर पडून मोठी दुर्घटना होवू शकते. या संदर्भात स्थानिकांनी संबंधित खात्याकडे तक्रार करून सुद्धा त्या तक्रारीचे निवारण केले जात नसल्याबद्दल या परिसरातील रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे. शहरातील सावरकर चौक परिसरात असलेली श्री योग सोसायटी याच्या समोरील विद्युत पोल तसेच मारुती मंदिराच्या बाजूला असलेला विद्युत पोल हा गेल्या काही दिवसापासून एका बाजूला झुकला असून तो कधीही खाली पडण्याची शक्यता आहे. तसेच सदर विद्युत पुल हा गंजलेला व अनेक ठिकाणी सडत चालला आहे. त्यामुळे हे दोन्ही विद्युत पोल खाली पडल्यास मोठी दुर्घटना होवू शकते.

तसेच त्यामुळे कित्येक काळासाठी विद्युत पुरवठा सुद्धा खंडीत होवून शॉर्टसर्किट सारख्या घटना सुद्धा घडू शकतात व हे कोणाच्या जीवावर तरी बेतू शकते. अत्यंत जुन्या काळातील हे विद्युत पोल उभारले असून त्याची अवस्था सध्यातरी दयनिय व जीर्ण झालेली आहेत. त्यामुळे हे दोन्ही विद्युत पोल तातडीने बदलण्याची गरज आहे. तसे न केल्यास मोठी दुर्घटना होवून जिवीतहानी सुद्धा होवू शकते. तरी याकडे संबंधित खात्याच्या अधिकार्यांनी लक्ष घालून हे विद्युत पोल बदलावे अशी मागणी स्थानिक रहिवाशी करीत आहेत.

# मीरा फाउंडेशनचा गरजवंतांना मदतीचा हातभार; चंद्रकांत चौधरी मित्र परिवाराचा पुढाकार



दै.रायगड नगरी । माथेरान

हिंदुहृदयसम्राट सरसेनापती स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांना अभिप्रेत असलेले ८०% समाजकारण आणि २०% राजकारण हेच अनमोल विचार अंगी बानून आणि ते विचार प्रत्यक्षात साकारण्याचे ध्येय माथेरान शिवसेनेचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी मित्र परिवाराच्या पुढाकाराने मीरा फाउंडेशनच्या माध्यमातून पूर्णत्वास जात आहेत.

माथेरान मधील दिव्यांग, मूकबधिर, निराधार विधवा महिलांना दरमहा एकहजार रुपये पेन्शन स्वरूपात दिली जात आहे.१६ डिसेंबर २०२१ पासून ह्या सत्कार्यास सुरुवात झाली असून आज दि.१६ जानेवारी रोजी पेन्शनचा दुसरा हप्ता सर्व गरजवंत लाभार्थ्यांना शिवसेना शाखेत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानाने देण्यात आला आहे. यावेळी चंद्रकांत चौधरी, मीरा फाउंडेशनच्या संचालिका रेखा चंद्रकांत चौधरी, उप शहरप्रमुख प्रमोद नायक, युवा सेनेचे अध्यक्ष निमेश मेहता,युवती सेनेच्या सुजाता कुंभार, अर्चना बिरामणे,संयुक्त वनसमितीचे विद्यमान अध्यक्ष योगेश जाधव, हॉटेल उद्योजक हरिभाई मेहता, जेष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर बागडे, अकबर मुजावर,मनोहर चाळके, रवी परब, प्रसिद्धी प्रमुख अमोल चौगुले, खालिद शेख, निखिल शिंदे, अल्ली डोंगरे, यांसह अन्य शिवसैनिक, आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.माथेरान मधील दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून चंद्रकांत चौधरी हे सुपरिचित आहेत.

आजही अनेकांना औषधोपचार करिता सढळ हस्ते मदत करीत आहेत. शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य त्याचप्रमाणे क्रीडाप्रेमींना साहित्याचे वाटप ते करीत आहेत.यामुळेच त्यांच्या या निस्वार्थी कार्याबद्दल कर्जत खालापूर मतदार संघाचे कार्यशील,विकासपुरुष आमदार महेंद्रशेठ थोरवे यांनी समाधान व्यक्त केले आहे.